रविवार, दि. ४ मे २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २६९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# खरीप हंगामाची पेरणी सुरु होण्यापूर्वी शेतकऱ्यांना बियाणे, खते व पीक कर्ज उपलब्ध करुन द्या - पालकमंत्री पंकजा मुंडे

## जिल्ह्यात खरीप हंगामात ६ लाख २९ हजार हेक्टरवर होणार पेरणी

**जालना । प्रतिनिधी -** खरीप हंगामातील पेरण्या सुरु होण्यापूर्वी शेतकऱ्यांना बियाणे, रासायनिक खते व पीक कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी आतापासूनच योग्य नियोजन करण्याचे निर्देश राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसवंर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांनी यावेळी दिले.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात खरीप हंगामपूर्व तयारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी श्रीमती मुंडे या बोलत होत्या. यावेळी खासदार कल्याण काळे, आमदार अर्जुन खोतकर, आमदार बबनराव लोणीकर, आमदार संतोष दानवे, आमदार नारायण कुचे, आमदार हिकमत उढाण, आमदार राजेश राठोड, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, प्रभारी जिल्हा पोलीस अधीक्षक आयुषकुमार नोपाणी, अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती रिता मैत्रवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, विभागीय कृषी सहसंचालक पी.आर. देशमुख, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी जी. आर. कापसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, कृषी विभागाने यावर्षी खरीप हंगामातील पेरणीचे प्रस्तावित क्षेत्राच्या प्रमाणात बियाणे रासायनिक खते शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे. तसेच पावसाअभावी शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ येवू नये. पुरेसा पाऊस झाल्यावरच शेतकऱ्यांनी पेरणी करावी. यासाठी कृषी विभागाने शेतकऱ्यामध्ये व्यापक जनजागृती करावी. तसेच पीक पेरणीची योग्य पद्धत, बियाणांची निवड आणि पेरणीपूर्व प्रक्रिया, पेरणीचा योग्य कालावधी आदीबाबतीची माहिती शेतकऱ्यांना द्यावी. शेतकऱ्यांपर्यंत अत्याधुनिक तंत्र पोहोचविण्यासाठी क्षेत्रिय कर्मचारी आणि शेतकऱ्यांनी समन्वय ठेवावा. शेतक-यांना विविध पिकांच्या पेरणीची योग्य वेळ आणि पद्धत, त्या पिकांवर येणारे रोग आणि त्याअनुषंगाने करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना याविषयी सविस्तर माहिती देण्यासाठी कृषी विभागाने विशेष मोहीम राबवावी. जमिनीची उत्पादकता वाढवून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळेल यासाठी प्रयत्न करावा. जिल्ह्यात बोगस बियाणे आणि रासायनीक खतांची विक्री होवू नये, यासाठी पथके स्थापन करुन, दोषींवर कायदेशीर कारवाई करावी. शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त होताच पंचनामे करुन बियाणे नमुने तपासण्यापेक्षा बियाणे पुरवठादारांकडील साठे तपासून त्याचवेळी त्याची गुणवत्ता तपासावी. तसेच जादा दराने खत विक्री करणे, खतांचा साठा करून ठेवणे, असे अवैध काम करणाऱ्या विक्रेत्यांवर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी व त्यांच्या तक्रारींच्या निराकरणासाठी योग्य उपाययोजना कराव्यात. तसेच खरिप हंगामाकरीता शेतकऱ्यांना बँकेच्या माध्यमातून होणारे कर्ज वितरणाचे उद्दिष्ट हे जून पर्यंत पूर्ण करावे. शेतकऱ्यांना बँकेत चकरा माराव्या लावू नये याची दक्षता घ्यावी. तसेच पात्र लाभार्थ्यांना पंतप्रधान कुसुम योजना आणि मागेल त्याला सौर कृषी पंप योजनाचा लाभ वेळेत मिळावा यासाठी नियोजन करावे. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना अंतर्गत लाभार्थ्यांना वेळेत लाभ देण्यात यावा अशा सूचना पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी संबंधीतांना दिल्या.

तसेच जिल्ह्यातील ज्या गावातून टँकरची मागणी होताच, त्या गावास तात्काळ पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच टँकर, पुरक नळ योजना, विहिर अधिग्रहण इत्यादी उपाययोजनांद्वारे सर्वसामान्य नागरिकांना पाणी टंचाईचा त्रास होणार नाही याची जिल्हा प्रशासनाने दक्षता घ्यावी असे निर्देश ही पालकमंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी यावेळी दिले.




जिल्ह्यात ६ लाख २९ हजार हेक्टर क्षेत्रावर खरिपाच्या पेरणीसाठी नियोजन आज सादर करण्यात आले. त्यात सर्वाधिक क्षेत्रावर म्हणजेच २ लाख २१ हजार हेक्टरवर सोयाबीन तर २ लाख ९१ हजार हेक्टर क्षेत्रावर कापूस या पिकांचे नियोजन करण्यात आले आहे. कापूस आणि सोयबीन पिकासाठी बियाण्यांची उपलब्धता करण्यात आली आहे. जिल्ह्यात कापूस पिकाच्या नियोजित क्षेत्रावर पेरणीसाठी बियाण्यांची ११ लाख ५१ हजार पाकिटे लागणार आहेत. त्याचे नियोजन करण्यात आले असून, सोयाबीन पिकासाठी ६५ टक्के घरच्या बियाण्यांचा वापर होणार आहे. तसेच उर्वरीत ३५ टक्के म्हणजे ५७ हजार ५६५ क्किंटल बियाण्यांचे नियोजन करण्यात आले आहे. सोबतच खरीप ज्वारी, मुग, तूर, उडीद, भुईमूग, सूर्यफुल, तीळ या पिकांच्या पेरणीचे नियोजन करण्यात आले आहे. या सर्व पिकांच्या लागवडीसाठी ७३ हजार ०७६ क्किंटल बियाण्याची आवश्यकता असून, त्याची मागणी नोंदविण्यात आली आहे. तसेच खरिप हंगामाकरीता आवश्यक व अपेक्षित बियाणे, खते, किटकनाशके यांचे योग्य नियोजन कृषी विभागामार्फत करण्यात आल्याचे यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जी. आर. कापसे यांनी सांगितले.

बैठकीच्या प्रारंभी पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते जालना कृषी विभागाच्या व्हॉटस् अप चॅनल आणि घडिपत्रिकाचे विमोचन करण्यात आले.

यावेळी बैठकीस उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक प्रेषीत मोघे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था परमेश्वर वरखडे, कृषि विकास अधिकारी प्रभाकर बनसावडे, सर्व उपविभागीय कृषी अधिकारी व सर्व तालुका कृषि अधिकारी यावेळी उपस्थिती होते.

---

युवा आदर्श

## हैवान ...

परत होतोयं जागा
युध्द नामक हैवान
जखमा होई ताज्या
विसरले कुठे तैवान
विमानाच्या घिरट्या
झाकाळले अस्मान
नात्यात येई दुरावा
गढूळले आरस्पान
महासत्तेचा हव्यास
माणूस होई बेभान
रगडले ते सामान्य
आहे कुणाला भान
तैवानचे महायुध्द
केले जरी सावधान
सावरलो ना अजून
कुठे गेले अवधान
भ्रामक शक्तीचा करे
का व्यर्थ अभिमान
वेळी आवर विनाश
थांबवा सारे थैमान
आधुनिक क्षेपणास्त्रे
चालू होई घमासान
सर्वसामान्य माणसा
गळून जाते अवसान

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

---

# बांबूला पर्यावरणपूरक पिकाचा दर्जा देण्यात यावा

## डॉ. सुयोग कुलकर्णी यांचे पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांना साकडे

**जालना । प्रतिनिधी -** बांबू हे शेतकऱ्यांसाठी कमी खर्चिक, शाश्वत उत्पन्न देणारे व पर्यावरणपूरक पीक असून, त्याला 'पर्यावरणपूरक पिकाचा' अधिकृत दर्जा देण्यात यावा, अशी मागणी बांबू लागवड चळवळीचे जिल्हा समन्वयक डॉ. सुयोग कुलकर्णी यांनी राज्याच्या पर्यावरण मंत्री व जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्याकडे केली आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीसाठी पंकजाताई मुंडे जालना येथे आल्या असता, डॉ. सुयोग कुलकर्णी यांनी बांबूपासून निर्मित आकर्षक पर्यावरणस्नेही फोटो फ्रेम देऊन त्यांचा सन्मान केला. त्यानंतर त्यांनी बांबू लागवडीसंदर्भातील मागण्यांचे सविस्तर निवेदन त्यांच्याकडे सुपूर्द केले. यावेळी आ. अर्जुनराव खोतकर, आ. बबनराव लोणीकर, आ. संतोष दानवे, आ. हिकमत उढाण, आ. नारायण कुचे व जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, योगेश शिंदे, शैलेश बजाज, संजय लोंढे, भाऊसाहेव घुगे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. कुलकर्णी यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे की, बांबू हे



कमी पाणी, कमी खर्च, प्रतिकूल हवामानातही तग धरणारे व तापमान संतुलन राखणारे पीक आहे. याच्या लागवडीला पर्यावरणपूरक पीक म्हणून दर्जा देण्यात आल्यास, राज्याच्या हरित धोरणांना अधिक बळ मिळेल. बांबू हवामान पान ३ वर

# चुकून निमंत्रण देणे राहिले असेल अजित पवारांकडून दिलगिरी व्यक्त

**मुंबई -** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनं मुंबईत गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव आयोजित केला आहे. या महोत्सवात राज्याच्या आजी माजी मुख्यमंत्र्यांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मुख्यमंत्री नारायण राणे, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण उपस्थित होते. या कार्यक्रमाला मविआशी संबंधित माजी मुख्यमंत्री उपस्थित राहिले नाहीत. शरद पवार, उद्धव ठाकरे, सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण हे उपस्थित राहिले नाहीत. शरद पवार यांच्याकडून निमंत्रण मिळालं नसल्यानं उपस्थित राहण्याचा प्रश्न नाही असं सांगण्यात आलं. याचाच धागा पकडत अजित पवार यांनी आपण माजी मुख्यमंत्री यांना बोलावल होतं. यदा कदाचित आमच्याकडून चुकून कुणाला माजी मुख्यमंत्री यांना निमंत्रण देण राहिलं असेल तर माफी मागतो दिलगिरी व्यक्त करतो, असं म्हटलं. यावेळी अजित पवार यांनी शरद पवार यांचं नाव घेणं टाळल्याचं पाहायला मिळालं.

उत्तर महाराष्ट्राला मुख्यमंत्रिपदाची संधी मिळाली नाही

गेली ३५ वर्ष काम करण्याची संधी मिळाली. राजीव गांधी यांच्या काळात बारामती लोकसभा पान ३ वर

# पहलगाम हल्ल्यानंतर संशयितांची चौकशी

**नवी दिल्ली -** पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तपास एनआयए करत आहे. संपूर्ण टीम श्रीनगरमध्ये कॅम्पिंग करत आहे. तपास यंत्रणेचे महासंचालक आज श्रीनगरहून दिल्लीला परतू शकतात, असे मानले जात आहे. त्यानंतर ते आज गृह मंत्रालयाला आपला अहवाल सादर करतील. एनआयएने हल्ल्याशी संबंधित ३००० हून अधिक संशयितांची चौकशी करण्यात आली आहे. तसेच महत्वाच्या १०० ठिकाणांवरही छापे टाकले आहेत. त्यामुळं दहशतवादी नेमके कसे पहलगाममध्ये पोहोचले याची माहिती मिळणार आहे.

एनआयएचे महासंचालक (डीजी) सदानंद दाते हे पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा प्राथमिक अहवाल गृह मंत्रालयाला सादर करतील. केंद्र सरकार या हल्ल्याबाबत अत्यंत गंभीर आहे आणि तपास यंत्रणांना सर्व पैलूंची सखोल चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या एनआयए पथकाने पीडित कुटुंबांचे जबाबही नोंदवले होते. त्यांच्या भेटीदरम्यान, एनआयएचे महासंचालक यांनी बैसरन व्हॅलीला पान ३ वर

केरळमधील 'शिवोहम् टेंपल ऑफ कॉन्शियसनेस'च्या वतीने देण्यात आला पुरस्कार !

# सनातन संस्थेच्या श्रीचित्शक्ति अंजली गाडगीळ यांना 'शिव शक्ति' पुरस्कार प्रदान !

**कन्नूर । प्रतिनिधी -** सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या एक आध्यात्मिक उत्तराधिकारी तथा महर्षींच्या आज्ञेने देश-विदेशांत लाखो किलोमीटर भ्रमंती करणार्या, तहान-भूक, उन-पाऊस यांची तमा न बाळगता धर्मप्रसार करणार्या श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना ' शिव शक्ति ' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. केरळमधील 'शिवोहम् टेंपल ऑफ कॉन्शियसनेस ट्रस्ट'च्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला. स्वतःतील आंतरिक शक्ती, दृढ निश्चय आणि कृपाशीर्वाद यांद्वारे नेतृत्व करून दिशादर्शन करणार्या महिलांना हा पुरस्कार देण्यात येतो.

'सनातन एकल वास्तूरत्न'चे कुलपती ब्रह्मश्री डॉ. सोमनाथ राघवन् आचार्य यांनी श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ यांना हा पुरस्कार प्रदान केला. 'शिवोहम् स्पिरिच्युअल वेलनेस सेंटर'च्या मुख्य चिकित्सक डॉ. ज्योती शमिथ यांनी प्रमाणपत्र देऊन, तर सौ. सुधा रविंद्रनाथ यांनी शाल प्रदान करून श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ यांचा सन्मान केला. 'शिवोहम् टेंपल ऑफ कॉन्शियसनेस ट्रस्ट' ही अध्यात्म, संस्कृती, ध्यान, योग आदींविषयी जागृती करणारी संस्था असून ती संयुक्त राष्ट्रांच्या 'यू. एन्. ग्लोबल कॉम्पॅक्ट'शी संलग्न आहे. पुरस्कार स्वीकारतांना श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ म्हणाल्या की, हा पुरस्कार मला मिळाला नसून आमचे गुरुदेव सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांना मिळाला आहे. मी केवळ एक माध्यम आहे. गुरुकृपेमुळेच आपण जीवनात यशस्वी होतो. गुरुदेवांच्या कृपेनेच आपले जीवन सात्त्विक होते आणि आपल्या जीवनाला एक अर्थ



प्राप्त होतो. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी 'मनुष्यजन्माचा प्रमुख उद्देश ईश्वरप्राप्ती करणे हाच आहे, हे मनावर बिंबवून समाजाला अध्यात्म आणि साधना यांकडे वळवले आहे. साधनेमुळे व्यक्तीच्या जीवनातील प्रत्येक कर्म सात्त्विक झाले, तर पान ३ वर

## संपादकीय

# लोकांच्या चांगुलपणावर का जळायचे?

## भारतीय क्रिकेटचे भविष्य




आयपीएल म्हणजे रत्नांची खाण असे म्हंटले जाते कारण दरवर्षी आयपीएल मध्ये असे काही नवीन रत्न उदयास येते की ज्या रत्नांनी संपूर्ण क्रिकेट विश्वच उजळून निघते. अशाच एका उगवत्या रत्नाने केवळ भारतीय क्रिकेटच नव्हे तर संपूर्ण क्रिकेट विश्वच उजुळून निघाले आहे आणि हे रत्न आहे अवघ्या १४ वर्षाचं आणि त्याचं नाव आहे वैभव सूर्यवंशी. सध्या आयपीएलमध्ये वैभव सूर्यवंशी या १४ वर्षाच्या मुलाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे अर्थात त्याने तसा कारनामा ही करून दाखवला आहे. मूळचा बिहार राज्यातील असलेला वैभव सूर्यवंशी हा अवघा १४ वर्षाचा युवा खेळाडू आहे. राजस्थान रॉयल्स या संघाने ज्यावेळी त्याच्यावर १ कोटी १० लाखांची बोली लावून त्याला आपल्या संघात घेतले त्याच वेळी त्याची चर्चा सुरू झाली. राजस्थान रॉयल्स संघाने या १४ वर्षाच्या मुलावर इतका मोठा दाव का लावला असा प्रश्न विचारला गेला त्याचे उत्तर शोधण्यासाठी थोडं मागे जावे लागेल. वैभव सुर्यवंशीने १२ व्या वर्षीच बिहार कडून १९ वर्षाखालील संघातून विनू मंकड चषक स्पर्धेत भाग घेतला. तिथे त्याने चांगली कामगिरी केल्याने त्याची निवड बिहारच्या रणजी संघात करण्यात आली. बिहारकडून रणजी स्पर्धेत खेळणारा सर्वात कमी वयाचा तो खेळाडू ठरला. १३ व्या वर्षी वैभवने विजय हजारे चषकात धावांचा रतीब घातला त्यामुळे त्याची भारताच्या १९ वर्षाखालील ब संघात निवड झाली. चार संघात झालेल्या स्पर्धेत त्याने ६ डावात १७७ धावा काढल्या त्यात त्याने दोन अर्धशतके झळकावली त्यामुळे ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारताच्या १९ वर्षाखालील मुख्य संघात त्याची निवड झाली. १९ वर्षाखालील कसोटीतील पदार्पणाच्या सामन्यात त्याने अवघ्या ५८ चेंडूत शतक झळकावले त्यावेळी त्याचे वय १३ वर्ष होते. त्यानंतर १९ वर्षाखालील आशिया कप स्पर्धेत तर त्याने धुमाकूळ घातला. तिथे युएई विरुद्ध त्याने ४६ चेंडूत ७६ धावा काढल्या तर उपांत्य फेरीत श्रीलंके विरुद्ध ३६ चेंडूत ६७ धावा काढल्या. या स्पर्धेपासून त्याची सर्वत्र चर्चा होऊ लागली. ही चर्चा राजस्थान रॉयल्स संघाच्या पदाधिकाऱ्यांना समजली. त्यांनी त्यांचा बॅटिंग कोच असलेल्या विक्रम राठोडला वैभव सूर्यवंशीची फलंदाजी पाहण्यास सांगितली. विक्रम राठोड यांनी वैभवला खेळताना पाहिले आणि त्याला आपल्या संघात घेण्याचे निश्चित केले. त्यांचा मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड हा तर नवोदित खेळाडूंना संधी देण्यास प्रसिद्ध आहे. त्याने देखील वैभवची फलंदाजी पाहिली आणि त्याला संधी देण्याचे ठरवले आणि अशा प्रकारे त्याची राजस्थान संघात एन्ट्री झाली. आयपीएल सुरू झाली पण सुरुवातीच्या काही सामन्यात वैभवला संधी मिळाली नाही. लखनऊ या संघाविरुद्ध राजस्थान रॉयल्सने त्याला संधी दिली. वैभव या संधीची वाटच पाहत होता. त्याने या संधीचे सोने करायचे ठरवले आणि पहिल्याच चेंडूवर त्याने अनुभवी शार्दुल ठाकूरला पुढे सरसावत षटकार खेचला आणि सर्वांना चकित केले. या सामन्यात त्याने २० चेंडूत ३४ धावा काढून आपल्या आयपीएल कारकिर्दीची धडाकेबाज सुरुवात केली. दुसऱ्या सामन्यातही त्याने चांगली खेळी केली मात्र आपल्या तिसऱ्या सामन्यात तर त्याने कमाल केली. गुजरात टायटन्स विरुद्धच्या या सामन्यात त्याने केवळ ३८ चेंडूत १०१ धावांची धमाकेदार खेळी करत शतक झळकावले. या शतकासोबत त्याने अनेक विक्रमांना गवसणी घातली. तो आयपीएल इतिहासातील सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा खेळाडू ठरला. केवळ आयपीएलच नाही तर टी २० क्रिकेट इतिहासात सर्वात कमी वयाचा शतक झळकावणारा तो खेळाडू ठरला. आयपीएलमध्ये सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा तो भारतीय ठरला. त्याने अवघ्या ३६ चेंडूत शतक झळकावत युसुफ पठाणचा विक्रम मोडला. एका सामन्यात त्याने सर्वाधिक षटकार मारणारा भारतीय खेळाडू ठरण्याचा विक्रमही त्याने आपल्या नावावर केला. या सामन्यात त्याने ११ षटकार खेचले ते ही ईशांत शर्मा, मोहम्मद सिराज, वॉशिंग्टन सुंदर आणि राशिद खान या आंतरराष्ट्रीय खेळाडूंविरुद्ध. त्याच्या या धडाकेबाज खेळीने सर्व आजी माजी खेळाडू आणि क्रिकेटप्रेमींनी त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. क्रिकेटचा देव म्हणून ओळखला जाणारा सचिन तेंडुलकरने वैभवच्या खेळीवर ट्विट केले की वैभवची निडर शैली, उत्कृष्ट बॅट स्पीड, चेंडूची लांबी पटकन ओळखण्याची क्षमता आणि चेंडूच्या मागे ताकद लावण्याची तयारी, या सर्वांचा संगम त्याच्या धमाकेदार खेळीमागे होता. ३८ चेंडूत १०१ धावा जबरदस्त कामगिरी. जबरदस्त खेळ....! केवळ सचिन तेंडुलकरच नव्हे तर अनेक दिग्गज खेळाडूंनी त्याच्या कौतुकाचे इमले बांधले. केवळ खेळाडूच नव्हे तर क्रिकेट प्रेमींनीही त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. क्रिकेट प्रेमींनी त्याच्या या खेळीचे व्हिडिओ, फोटो सोशल मीडियावर शेअर करत त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. मीडिया तर त्याच्यावर फिदाच झाली. त्याच्या या खेळीने त्याने आपण भारताचे भविष्य आहोत हे दाखवून दिले आहे. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या म्हणीप्रमाणे त्याने लहान वयातच आपण कोण होणार हे दाखवून दिले आहे. त्याच्या या लाजवाब खेळीने त्याच्यावर अचानक प्रसिद्धीचा झोत आला आहे. वैभवने मात्र या झगमगाटाकडे दुर्लक्ष करून खेळावर लक्ष केंद्रित करायला हवे. त्याला आणखी यशोशिखरे गाठायची असेल तर त्याने झगमगाटापासून दूर राहिलेलेच बरे. प्रसिद्धीच्या झगमगाटात वाहत जाऊन आपल्या करिअरचे मातेरे करणारे अनेक खेळाडू आपण पाहिले आहेत. विनोद कांबळी, पृथ्वी शॉ ही त्याची बोलकी उदाहरणे आहेत. वैभवने आपल्या खेळावर लक्ष केंद्रित करून आणखी मेहनत केल्यास तो भारतीय क्रिकेटचे भविष्य ठरेल यात शंका नाही. वैभवला खूप खूप शुभेच्छा !

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

---

आजकाल बुडाला आग लावून घेणाऱ्या जळक्या प्रवृत्तीच्या लोकांची संख्या प्रत्येक क्षेत्रात खूप वाढली आहे. एखाद्याच्या चांगुलपणावर जळणे, हे आजकालच्या काही लोकांचे वाईट धोरण बनले आहे. एखादा व्यक्ती एखाद्या क्षेत्रात आपल्यापेक्षा उत्कृष्ट व अप्रतिम कार्य करत असेल तर काही लोक विनाकारण आपल्या बुडाला आग लावून घेतात. नाहक अंगाचा तिळपापड करून घेतात. उगाच अंगाचा जळफळाट करून घेतात. अशा लोकांना आपल्यापेक्षा उत्कृष्ट व अप्रतिम कार्य करणारे व्यक्ती बिलकुल आवडत नाहीत. त्यांना स्वतःच्या कार्यकर्तृत्वाचा खूप गर्व आणि अभिमान वाटतो. म्हणून ते अंगाची लाही लाही करून घेतात. आणि स्वतःला दुःखाच्या खाईत लोटतात. त्यांना असे वाटते की, या क्षेत्रामध्ये माझ्यापेक्षा श्रेष्ठ व सरस कार्य करणारा दुसरा स्पर्धक तयार होऊ नये. जबरदस्त अवलिया म्हणून केवळ माझेच नाव कायम या क्षेत्रामध्ये गाजत राहावे आणि लोकांनी माझ्याच सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय कार्याची प्रशंसा करावी. माझ्या नावाचा जयजयकार करावा. असे जळक्या प्रवृत्तीच्या लोकांना मनोमन वाटत असते. म्हणून ते इतरांच्या चांगुलपणावर सारखे जळत राहतात. त्यांना नाहक बदनाम करून आपण स्वतः किती चांगले आहोत, हे लोकांना दाखवून देण्याचा पुरेपूर प्रयत्न करतात. अशा लोकांना इतरांचा चांगुलपणा जराही देखवत नाही. म्हणून ते अशा निर्मळ व स्वच्छ मनाच्या व्यक्तींना नेहमी नावे ठेवण्याचे काम करतात. त्यांना त्या कार्यापासून विचलित व डळमळीत करण्याचा प्रयत्न करतात. जगाने केवळ मलाच चांगले म्हणून माझ्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा उदो उदो करावा. म्हणून ते नेहमी धडपडताना दिसतात. पुरस्काराच्या लोभापाई राजकीय लोकांच्या मागेपुढे फिरतात. त्यांना साहेब साहेब म्हणून तोंडापूरते गोड गोड बोलतात. आपला वैयक्तिक स्वार्थ साधण्यासाठी मोठमोठ्या लोकांच्या संपर्कात राहतात. त्यांच्यासाठी आपण किती चांगले आहोत, हे त्यांना दाखवून देतात. आणि कुठलातरी गल्लीतला पुरस्कार घेऊन लोकांना गावभर सांगत फिरतात.

अशा जळक्या प्रवृत्तीच्या लोकांचा सुळसुळाट आता प्रत्येक क्षेत्रात वाढला आहे. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, साहित्यिक व राजकीय क्षेत्रात स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ व महान समजणाऱ्या स्वार्थी व जळक्या लोकांचा सुळसुळाट कमी न होता वाढतच जात आहे. ही जळक्या प्रवृत्तीची माणसे आपली तुलना इतरांबरोबर करू पाहतात. पण एखादा व्यक्ती एखाद्या क्षेत्रात आपल्यापेक्षा ज्ञानी व हुशार असेल तर ते पाहून त्यांना खूप खूप दुःख होते. तळपायाची आग मस्तकाला जाते. आणि ते त्यांना संपवण्याचा कुटील डाव रचतात किंवा त्यांना मागे खेचण्याचा पुरेपूर प्रयत्न करतात. इतका जळफळात काय कामाचा? एवढा दुष्टपणा काय कामाचा?

अशी जळकी माणसे आपल्याकडे असलेले ज्ञान इतरांना न देता लपवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. त्यांना माहीत असलेल्या आयडिया इतरांना कधीच शेअर करत नाहीत. त्यांना वाटते की हा आपल्यापेक्षा मोठा होईल. आपल्यापेक्षा एक पाऊल पुढे जाईल आणि आपले नाव मागे येईल, म्हणून ते आपल्यात असलेले ज्ञान किंवा गुपित गोष्टी इतरांना सांगायला घाबरतात. यदा कदाचित जरीही सांगितले तरी साफ खोटे सांगतात... अशा जळक्या लोकांना मी जवळून पाहिले आहे.

राजकीय क्षेत्रातील लोकांना असे वाटते की, या क्षेत्रामध्ये केवळ माझ्याच नावाचा बोलबाला असला पाहिजे. मीच जनतेचा खरा जनसेवक व तारणहार आहे, लोकांनी केवळ मलाच डोक्यावर घेतले पाहिजे. माझ्याच मागेपुढे फिरले पाहिजे. प्रत्येक कार्यक्रमात मलाच आमंत्रित करून माझा यथोचित सत्कार केला पाहिजे. असा समज काही लोकांच्या मनामध्ये झाला आहे. माझ्यामुळेच हा देश सुरक्षित आहे, नाहीतर या देशाचे कधीच तुकडे तुकडे झाले असते, असे ते लोकांना पटवून सांगतात. लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. या क्षेत्रातील बाप माणूस म्हणून माझेच नाव अजरामर राहावे. मलाच लोकांनी चांगले म्हणावे. केवळ माझ्याच नावाचा जयजयकार करावा. मलाच जनतेचा खरा जननायक म्हणावे. असे त्यांना मनोमन वाटत असते. सामाजिक क्षेत्रातील लोकांना असे वाटते की, सामाजिक क्षेत्रात माझ्याच नावाचा बोलबाला असला पाहिजे. समाज कार्य करणारा सामाजिक कार्यकर्ता म्हणून समाजाने माझ्याकडेच बघितले पाहिजे. माझ्यासारखा दुसरा सामाजिक कार्यकर्ता या समाजात होऊ नये. केवळ मीच समाजसेवक म्हणून जनतेच्या मनामध्ये कायम राहावे. शासनाने केवळ मलाच वेळोवेळी सामाजिक पुरस्कार देऊन सन्मानित करावे.असे त्यांना मनोमन वाटते. सामाजिक क्षेत्रात जर दुसरा एखादा समाजसेवक तयार होत असेल, तर त्याची नाहक बदनामी करून त्याला मागे कसे आणता येईल हा प्रयत्न ते दिमाखाने करतात. पण त्यांना यश मिळेलच असे नाही.जर त्या क्षेत्रात त्यांच्यापेक्षा जबरदस्त कार्य करणारा अवलिया असेल तर मग मात्र ते अंगाचा तिळपापड करून घेतात. स्वतःच्या बुडाला आग लावून अंगाचा जळफळाट करून घेतात. इतका जळफळाट कशासाठी हो? लोकांवर जळून मरण्यापेक्षा लोकांना जाळून मरणे हे कधीही चांगले. हे नेहमी लक्षात ठेवा. काही काही लोकांना तर स्वतःच्या चांगुलपणाचा खूप टीट्यूड असतो. माझ्यासारखा भारी दुसरा कोणीच नाही या भ्रमात ते राहत असतात. स्वतःला इतरांपेक्षा शहाणे व वेगळे समजतात आणि सगळ्यांपेक्षा निराळे राहतात. लोकांनी केवळ मलाच चांगले म्हणावे, आणि माझ्याच कार्याची प्रशंसा करावी असे त्यांना वाटते. पण त्यांना डावलून इतरांना जर कोणी चांगला म्हणत असेल तर ती गोष्ट त्यांच्या जिव्हारी लागते. म्हणून ते अंगाचा जळफळाट करून घेतात.

तर शैक्षणिक क्षेत्रातील काही लोकांना आपल्या शिक्षकी पेशाचा व शैक्षणिक कार्याचा खूप अभिमान वाटतो. माझ्यासारखे चांगले व छान अध्यापन करायला इतर शिक्षकांना जमत नाही. मीच विद्यार्थ्यांना तळमळीने व जीव ओतून शिकवतो. मीच खरा विद्यार्थी प्रिय व आदर्श शिक्षक आहे. मीच विद्यार्थ्यांना जादा तासिका घेऊन शिकवण्याचे महत्वपूर्ण काम करतो. असे लोकांना ते मोठेपणाने सांगतात. केवळ मलाच गावकऱ्यांनी चांगला मान सन्मान द्यावा व आदर्श शिक्षक म्हणून माझा यथोचित सत्कार करावा. आणि माझ्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन मला आदर्श शिक्षक पुरस्कार मिळण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा. म्हणून काही जळके लोक राजकीय क्षेत्रातील लोकांचे पाय धरताना दिसतात. पण जे शिक्षक खरोखरच पुरस्कारासाठी पात्र असतात. त्यांना डावलून कामचुकार, व्यसनी व राजकारणी शिक्षकांना पुरस्कार दिला जात आहे. ही शैक्षणिक क्षेत्रासाठी दुर्दैवाची बाब म्हणावी लागेल. पण ज्या शिक्षकांचे कार्य खरोखरच उल्लेखनीय व आकाशाएवढे उत्तुंग असते, अशा निस्वार्थी शिक्षकांना अनपेक्षितपणे जर एखादा पुरस्कार मिळाला तर काही जळक्या प्रवृत्तीचे शिक्षक त्यांच्यावर विनाकारण जळतात. त्यांना नावे ठेवून त्यांची नाहक बदनामी करण्याचा प्रयत्न करतात. आणि हेच जळके व कामचुकार शिक्षक कर्तव्यदक्ष व कर्तृत्वान शिक्षकांवर टीका करण्यात आघाडीवर असतात. लोकांना इतर शिक्षकांबद्दल वाईट सांगून त्यांची नाहक बदनामी करण्याचा पुरेपूर प्रयत्न करतात. हे मी शालेय व महाविद्यालयीन जीवनात शिक्षण घेत असताना प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहून अनुभवले आहे. म्हणून ही वस्तुस्थिती आपल्याला लेख रूपात सांगण्याचा प्रयत्न करत आहे.



माझी सर्व क्षेत्रातील तमाम कार्यकर्त्यांना विनंती आहे की, आपण विनाकारण लोकांच्या चांगुलपणावर जळफळाट करत बसू नका... नाहक बुडाला आग लावून घेऊ नका... जिद्दीने पेटून कार्य करायला शिका... इतरांवर जळफळाट केल्याने आपला काहीच फायदा होणार नाही... आपली राख मात्र होऊन जाते... आपल्याबरोबर इतरांनाही चांगले म्हणायला शिका... उगाच अंगाचा तिळपापड करून स्वतःला दुःख सागरात लोटू नका... आपण लोकांना कितीही वाईट म्हटले तर समाजाला माहित असते की, हा व्यक्ती खरंच वाईट आहे का चांगला?

आणि आपण स्वतःला कितीही चांगले म्हणत बसलो तर समाजही आपल्याला चांगला म्हणेलच असे नाही....

आपापल्या क्षेत्रात प्रामाणिकपणे कार्य करत रहा... समाज व गाव आपल्या कार्याची नकळतपणे जरूर दखल घेत असते... एवढे नक्की ध्यानात ठेवा...

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**मु.पो.खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

---

# आधुनिक युगात स्त्रियांची दशा आणि दिशा

आज आपण संगणक युगात वावरतो हे सांगताना खरंच आपण फार पुढारलेल्या विचाराचे आहोत आणि आपण समतेचे पाईक आहोत असे सांगण्याचा प्रयत्न किंबहुना भासविण्याचा प्रयत्न करत असतो पण नक्की आपण परिवर्तन वादी असल्याचा बुरखा घातला आहे का? की खरंच आपण याबाबतीत प्रयत्नशील आहोत का? का आपली भूमिका बगल में छुरी, मुह में राम अशी ५आहे एकीकडे महिलांसाठीच्या हक्क, न्यायासाठी जोरदार भाषणं ठोकायची आणि दुसरीकडे महिलांवर होणाऱ्या अन्याय अत्याचारावर मुग गिळून गप्प बसायचं, दुसऱ्या महिलांचे तोंडभरून कौतुक करायचे अन् घरातल्या महिलांना त्यांच्या हक्कापासून अधिकारापासून स्वप्नापासून वंचित ठेवायचे याचं कोडं अजूनही सुटत नाही, खरंच सामाजिक दबाव दडपण घरच्या महिलांना देऊन त्यांच्या हक्कापासून त्यांच्या व्यक्तिगत स्वातंत्र्यापासून अलिप्त ठेवणे म्हणजे खरंच त्यांना त्यांच्या ध्येयापासून अटकाव करणे हे कोणत्या चौकटीत बसते हे अजूनही मला उमजलं नाही, सामाजिक कार्य करीत असताना मला फार जवळून अनुभव आला स्त्री क्रांती, महिला स्वातंत्र्य या विषयावर खुप असे लोकं बघितले अनुभवले की फार पुरोगामी फार पुढारलेल्या विचाराचे आहेत पण खायचे दात वेगळे असतात, उगीच मणभर चर्चेपेक्षा कण भर आचरण हे केव्हांही फलदायी असते, नुसते विचार चांगले असून भागत नाही तर ते अंमलात येणे जास्त गरजेचं असते, आज राजकारणात आपण बघतो महिला केवळ नावालाचा असतात बाकी सगळं चित्र सर्वांना चांगलंच परिचित आहे वेगळं काही सांगायला नको अशीच परिस्थिती नोकरी करणाऱ्या महिलांची देखील आहे तिचा टाईम टेबल ठरलेला असतो कधी जायचं कधी यायचं घरी आल्यावर दुहेरी कसरत शिवाय तिचा तिच्या पगारावर खरंच अधिकार किती असतो? आताच सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली आहे त्यात १५०० ची वाट लाडक्या बहिणीपेक्षा लाडका मेव्हणाच् जास्त पाहताना दिसतो हेच ग्रामीण भागात चित्र आहे, खरंच आजच्या या युगात महिला सुरक्षित तर नाहीतच ते आपण मीडियावर पाहतोच आहोत पण अजूनही महिलांच्या वाट्याला स्वातंत्र्य आलंच नाही हेही खेदाने नमूद करावंस वाटते!

**सविता कांबळे**
**परतूर**

---

## दिशाहीन झालेली तरुणाई....

सध्या घरोघरी मुलांवर सुसंस्कार पडत आहेत कमी....
म्हणून तरुणाई दिशाहीन होऊन फिरत आहे गल्लोगल्ली....
ही अवस्था झाली आहे देशात सगळीकडेच सारखी...
या नादात तरुणाई समजत आहे थोरामोठ्यांना बारकी....
मोबाईलच्या नादात सगळी तरुणाई झाली आहे वेडी...
अहोरात्र फोनवर बोलत आहे लैला मजनूची जोडी...
अभ्यास सोडून रात्रभर फोनवर करत आहे चॅटिंग...
दिवसभर करत आहे मैदानावर क्रिकेटची बॅटिंग...
या नादात करून घेत आहे स्वतःचे जीवन बरबाद...
लग्नाला देत नाही कोणी मुलगी मग होतो पश्चात्ताप....
व्यसनाच्या आहारी जाऊन कवटाळत आहे मृत्यूला...
भर जवानीत स्वर्गी न्यायला बोलावत आहे यमाला....
आई-वडिलांचा व ज्येष्ठांचा करत आहे पदोपदी अपमान...
म्हणूनच त्यांना गावात व समाजात
मिळत नाही मानसन्मान...
भरकटलेली तरुणाई फिरत आहे मोकाट जनावरांप्रमाणे...
जणू शेत शिवारात रानभुल होऊन
फिरणाऱ्या रानटी पशुप्रमाणे...
हल्ली तरुणाई शिक्षणापासून दूर दूर जात आहे....
आणि विखारी व्ससनाच्या विळख्यात अडकून पडत आहे...
शिक्षणाच्या नावाखाली प्रेमाचा बाजार मांडत आहे....
दररोज धाब्यावर जाऊन चंगळवादी जीवन जगत आहे...
व्यसनाच्या बाबतीत मुलीही काही मुलांपेक्षा कमी नाहीत...
मोकाट फिरायला व बेभान वागायला मुलांपेक्षा मागे
नाहीत...
प्रेमाचे धडे गिरवायला मुली मुलांपेक्षा सरस आहेत....
प्रेमाच्या मायाजालात अडकून मायबापाला फसवत आहेत...
दिशाहीन झालेली तरुणाई दररोज दिशा बदलत आहे....
अभ्यास करायचा सोडून रोज एक नवी मुलगी पटवत
आहे....
म्हणून आजची तरुणाई विनाशाच्या उंबरठ्यावर उभी आहे...
योग्य मार्गाने जायचे सोडून अंधारात चाचपडत आहे.....

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**

---

# स्वसंरक्षणासाठी मार्शल आर्ट्स आवश्यक
## दुसरी राष्ट्रीय मार्शल आर्ट्स स्पर्धा

**मुंबई** - महिलांच्या स्वसंरक्षणासाठी सरकारने कठोर उपाययोजना करणे आवश्यक झाले आहे, कारण आजकाल महिलांवरील अत्याचार वाढले आहेत आणि त्यांना संरक्षणाची आवश्यकता आहे, म्हणून त्यांच्यासाठी मार्शल आर्ट्स शिकणे महत्वाचे आहे.

गेल्या ४२ वर्षांपासून, इंडियन मार्शल आर्ट्स अकादमी संपूर्ण भारतात ही कला शिकवत आहे.

इंडियन मार्शल आर्ट्स अकादमी २६ मे ते २८ मे दरम्यान पुण्यात अखिल भारतीय दुसरी राष्ट्रीय मार्शल आर्ट्स स्पर्धा २०२५ आयोजित करत आहे. मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत या कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली.




अखिल भारतीय अध्यक्ष डॉ. हुलगेश चालवाडी, महाराष्ट्र अध्यक्ष ॲड. पत्रकार परिषदेत उपस्थित होते. गौरी छाब्रिया, अखिल भारतीय युवा अध्यक्षा सीमा सरोज, अखिल भारतीय युवा अध्यक्ष पितांबर साळुंके, मुंबई युवा अध्यक्ष जय मेहता, इंडियन मार्शल आर्ट्स अकादमीचे संस्थापक विश्वस्त सुदर्शन साळुंके आदी उपस्थित होते. कार्यक्रमात पुणे युवा अध्यक्ष आशिष साळुंके, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष नीलेश साळुंके आणि जनसंपर्क अधिकारी अब्दुल कादिर काजर्गी इत्यादींनी स्पर्धेबद्दल सविस्तर माहिती दिली. यावेळी अखिल भारतीय महिला अध्यक्षा आणि कमानी ट्यूबच्या सीएमडी पद्मश्री कल्पना सरोज म्हणाल्या की, केंद्र सरकारने मार्शल आर्ट्सना पाठिंबा द्यावा जेणेकरून मार्शल आर्ट्सला सरकारी दरबारात मान्यता मिळेल. देशभरातील सहभागींना या स्पर्धेत भाग घेण्याची संधी मिळेल. सहभागींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रॉफी आणि रोख बक्षीस दिले जाईल.

---

# जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव निमीत्त व्याख्यानाचे आयोजन

**मंठा । प्रतिनिधी** - जगज्योती महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव सामितीच्या वतीने दिनांक ४ मे २०२५ रविवार रोजी शरण साहित्य अभ्यासक ॲड. निळकंठ ताकबीडकर यांचे व्याख्यानाचे आयोजन जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे. तत्पुर्वी सकाळी १० वाजता संगेवार कॉम्पलेक्स मंठा येथे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यानंतर सायं. ५ ते ८ छत्रपती संभाजी महाराज चौंक ते छत्रपती शिवाजी महाराज चौंक मंठा पर्यत भव्य रॅली काढण्यात येईल आणि ८ ते ९ वाजता लक्ष्मी नारायणमंदीर येथे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. बसवराज कोरे, ॲड. मधुकर लिंगायत श्री राजेंद्र वांजुळे, विनोद वीर (संचालक मंगलनाथ बँक) यांची उपस्थिती राहणार आहे. तरी सर्व समाज बांधवांनी व्याख्यान श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांचे अतिवृष्टी, पूर व गारपिटीचे ५६ कोटी रुपयांचे सानुग्रह अनुदान हडप करणाऱ्या दोन्ही उपविभागीय अधिकारी व चारही तहसीलदारांवर तात्काळ कारवाई करा

## आमदार बबनराव लोणीकर यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी-** अतिवृष्टी, पूर व गारपिटीमुळे जालना जिल्ह्यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. त्या शेतकऱ्यांना शासनाकडून कोट्यवधी रुपयांचे सानुग्रह अनुदान मंजूर देखील झाले. त्या अनुदानापैकी प्रथमदर्शनी ५६ कोटी रुपये अंबड व भोकरदन हे दोन्ही उपविभागीय अधिकारी आणि अंबड, घनसावंगी, भोकरदन व जाफराबाद या चार तहसीलदारांच्या संगनमताने तहसीलदारांचे लॉगिन वापरून हडप करण्यात आले आहेत. चुकीच्या पद्धतीने शेती नसलेले किंवा बीड, अहिल्यानगर व बुलढाणा यासह इतर रहिवाशी असणाऱ्या नातेवाईकांची नावे गावातील शेतकऱ्यांच्या यादीत समाविष्ट करून किंवा काही ठिकाणी दुबार नावाचा वापर करून शासकीय अनुदान लाटण्यात आले. ही रक्कम ५६ कोटी वरून १०० कोटी रुपयांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे त्यामुळे संबंधित तलाठी ग्रामसेवक कृषी सहायक यांच्याबरोबरच दोन्ही उपविभागीय अधिकारी व चारही तहसीलदार यांच्यावरही कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली आहे.

पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या जिल्हास्तरीय खरीप हंगाम पूर्व बैठक दरम्यान आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. यावेळी आमदार अर्जुन खोतकर खासदार कल्याण काळे, आमदार नारायण कुचे आमदार हिकमत उढान, आमदार राजेश राठोड, आमदार संतोष दानवे, जिल्हाधिकारी डॉ श्रीकृष्ण पांचाळ यांच्यासह सर्व विभागांचे विभाग प्रमुख अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, काही तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहायकांनी संयुक्तरीत्या पाहणी करून झालेल्या नुकसान भरपाई चा अहवाल शासनाकडे सादर करणे अपेक्षित आहे हा अहवाल तहसीलदार यांच्या लॉगिन वरून उपविभागीय अधिकारी व त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवला जातो परंतु या नुकसान भरपाईची पाहणी करत असताना तलाठी ग्रामसेवक व कृषी सहाय्यक अशी त्रिसदस्य समिती असताना केवळ तलाठी केवळ ग्राम सेवक किंवा केवळ कृषी सहाय्यक यांनी एकट्यानेच पाहणी दौरा केला व इतर दोघांनी त्यावर केवळ स्वाक्षरी केली असे देखील निदर्शनास आले आहे परिणामी चुकीच्या पद्धतीने बोगस नावे समाविष्ट करण्यात आली आहेत ही बाब तलाठी ग्रामसेवक कृषी सहाय्यक यांच्यासह तहसीलदार किंवा उपविभागीय अधिकारी यांनी कोणीही फेर तपासणी न करता थेट अहवाल जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे सादर केला आहे. कामात हलगर्जीपणा केल्यामुळे हा प्रसंग निर्माण झाला असल्याचे देखील आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

घनसावंगी, अंबड, जाफराबाद व भोकरदन या तालुक्यांत १२,००० बोगस शेतकरी दाखवून त्यांच्या नावावर सानुग्रह अनुदान वितरित करण्यात आले व त्यानंतर ती रक्कम संबंधितांच्या खात्यावरून काढण्यात आली. त्यासाठी त्यांनी तहसीलदारांच्या लॉगिन व पासवर्ड वापरला. अपहारासाठी जालना जिल्ह्यात बीड, अहिल्यानगर, बुलाडाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांची नावे अनुदान यादीत घुसवण्यात आली आहेत. विशेष म्हणजे एकाच शेतकऱ्याचे नाव अनेकदा वापरून दुबार नावाचा वापर करत मोठी रक्कम हडप करण्यात आली आहे. त्याचबरोबर गायरान जमिनीवर किंवा पडीक जमिनीवर बाहेरच्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांची नावे समाविष्ट करून अनुदान उचलण्यात आले आहे. जिल्हाभरात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची संख्या मोठी व शासनाकडून याद्या अपलोड करण्यासाठी पाठपुरावा सुरू असल्यामुळे तहसीलदारांचे लॉगिन व पासवर्ड वापरून काही तलाठी ग्राम सेवक व कृषी सहाय्यक यांनी संबंधित तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांच्याशी संगणमताने बोगस नावे समाविष्ट करण्यात आली आहेत असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांनी अपलोड करण्यात आलेल्या याद्यांची फेरतपासणी न केल्यामुळे थेट डीबीटीद्वारे संबंधितांच्या बँक खात्यात पैसेही जमा झाले. तलाठी ग्रामसेवक व कृषी सहाय्यक या त्रि सदस्य समितीने अपलोड केलेल्या याद्यांची खातरजमा मंडळ अधिकारी, तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारी यांनी करणे अपेक्षित होते. परंतु असे करण्यात आलेली नाही एकट्या अंबड, घनसावंगी तालुक्यात ५६ कोटी रुपये सानुग्रह अनुदान बोगस लाभार्थीच्या नावे जमा झाल्याचे समोर आले आहे. ही रक्कम संबंधित दोन्ही उपविभागीय अधिकारी व चारही तहसीलदार यांच्याकडून वसूल करण्यात यावी अशी मागणी देखील आमदार लोणीकर यांनी केली आहे

शेतकऱ्यांना वेठीस न धरता खताची कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा कृषी अधीक्षक यांची भूमिका महत्त्वाची असून वाढीव दराने डीलर खतांची खरेदी करतो त्यामुळे वाढीव दराने सब डीलर ला विक्री केली जाते पुढे सब डीलर कृषी सेवा केंद्रांना आणि कृषी सेवा केंद्र शेतकऱ्यांना अधिकचे पैसे घेऊन कृत्रिम टंचाई निर्माण करत खताच्या मूळ किमतीपेक्षा अधिकच्या दराने विक्री करून शेतकऱ्यांची लुबाडणूक करतात ही बाब अत्यंत गंभीर असून यामध्ये केवळ कृषी सेवा केंद्र चालकावर कारवाई केली जाते असे न करता कृषी सेवा केंद्र चालकासह डीलर आणि सब डीलर यांच्यावर देखील तितक्याच गंभीर स्वरूपाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली. यासाठी राज्य कृषी विभाग जेवढा जबाबदार आहे तेवढाच जिल्हा परिषद कृषी विभाग देखील जबाबदार आहे असेही आमदार लोणीकर यावेळी म्हणाले.



पेरणीला सुरुवात होण्यापूर्वी भेसळयुक्त खते व बोगस बियाणे याची बाजारात मोठ्या प्रमाणात विक्री केली जाते. परिणामी संबंधित बियाण्याची उगवण शक्ती पूर्ण आहे किंवा नाही या सदर्भात बियाणे महामंडळाने सतर्क राहून तपासणी करणे अपेक्षित आहे. असे स्पष्ट करत मागील काळात बियाणे महामंडळाच्या जालना कार्यालयाने जालना छत्रपती संभाजी नगर अहिल्यानगर व बीड या चार जिल्ह्यांमध्ये ३० हजार टन बोगस बियाणे विक्री केले होते त्याचप्रमाणे परभणी बियाणे महामंडळाच्या कार्यालयाने हिंगोली परभणी लातूर सोलापूर व धाराशिव या पाच जिल्ह्यांमध्ये ३५ टन बोगस बियाणे विक्री केली होती याची आठवण करून दिली. तसेच जालना व भोकरदन या दोन ठिकाणी माती मिश्रित खतांचे कारखाने सुरू करण्यात आले होते त्यावर देखील मागील काळात कारवाई करण्यात आली असल्याचे लोणीकरांनी निदर्शनास आणून दिले त्यामुळे यापुढे माती मिश्रित खते निर्मिती करणारे कारखाने व विक्री करणारे दुकानदार यांच्यासह बोगस बियाण्याची विक्री करणारे आणि बोगस बियाणे निर्माण करणाऱ्या कंपन्यांवर देखील फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी आमदार लोणीकर यांनी केली.

सद्यस्थितीत प्रचंड उन्हाळा असून शेतीसाठी जनावरांसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी प्रचंड वणवण करावी लागत आहे अशा परिस्थितीत गोदावरी नदीवरील राजा टाकळी जोगलादेवी व लोणी सावंगी हे तीनही उच्च पातळी बंधारे कोरडे पडले असून यामध्ये तात्काळ पाणी सोडण्यात यावे अशी मागणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी या बैठकीदरम्यान केली. तसेच गोदावरीतील उच्च पातळी बंधाऱ्यांसह अंबड ते कासापुरी पर्यंतच्या चाऱ्यांना देखील पाणी सोडण्यात यावे अशी मागणी लोणीकरांनी केली. टंचाईच्या काळात जिल्हाधिकारी यांना या संदर्भातील अधिकार असून जिल्हाधिकाऱ्यांनी गोदावरी खोरे महामंडळाकडे तात्काळ मागणी करून उच्च पातळी बंधार्यांसह चार क्रमांक ३८, ३९, ४० व ४१ मध्ये तात्काळ पाणी सोडण्यात यावे. चारी क्रमांक ४० वरील शेतकऱ्यांनी नऊ लाख रुपयांचा भरणा केला असून या संदर्भात कार्यकारी अभियंता श्री जाधव यांच्याशी प्रत्यक्ष बोलणे झाले आहे परंतु असे असले तरी जिल्हाधिकाऱ्यांनी गोदावरी खोरे महामंडळाकडे तात्काळ मागणी करून च्च पातळी बंधार्यात व या चारही चाऱ्यांमध्ये पाणी सोडण्या सदर्भात व्यवस्था करावी अशी सूचना आमदार लोणीकर यांनी केली.

अपघातामध्ये शेतकऱ्याचा मृत्यू झाल्यास लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे अपघात विमा योजनेअंतर्गत मदत केली जाते परंतु ही मदत करत असताना या योजनेमधील कठोर अटी व नियमावली मुळे शेकडो शेतकरी कुटुंबीय वंचित राहत आहेत यामध्ये तालुकास्तरावर जिल्हा सरावर व राज्यस्तरावर गठीत करण्यात आलेल्या समितीच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या दिरंगाईमुळे व यामधील जाचक अटींमुळे सर्वसामान्य शेतकरी कुटुंबीयांना याचा लाभ मिळत नाही परिणामी यामधील अटी शिथिल करून अधिकाधिक अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदत व्हावी यासाठी प्रयत्न करावेत. जालना जिल्ह्यामध्ये २२५ प्रकरणे मागील अनेक दिवसांपासून प्रलंबित असून प्रकरण मंजूर असताना देखील अद्याप पर्यंत मदत मिळालेली नाही या सर्व प्रकरणांना तात्काळ निधी उपलब्ध करून देण्यात यावा व जाचक अटी रद्द करण्यात यावे अशी मागणी सुद्धा आमदार बबनराव लोणीकर यांनी या बैठकीदरम्यान केली.

# केंद्र सरकारचा जातीय जनगणनेचा निर्णय ऐतिहासिक, ओबीसी वर्गासाठी संजीवनी - शंकर मुळे

**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी -** नुकतीच केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळाने केंद्र सरकारने अखेर जातीनिहाय जनगणनेसाठी हिरवा कंदील दाखवला. ही केवळ एक राजकीय घोषणा नाही, तर देशातील सामाजिक न्यायाची लढाई लढणाऱ्या कोट्यवधी ओबीसी बांधवांसाठी एक ऐतिहासिक विजय आहे. तसेच समस्त भारत वर्षातील ओबीसी समाजासाठी संजीवनी ठरणार आहे.आपण गेल्या कित्येक दशकांपासून एकच मागणी करत आलो - आमची खरी लोकसंख्या मोजा, आमचं प्रतिनिधित्व नक्की करा. संविधानिक मूल्यांवर आधारित लोकशाहीत योजना, शिक्षण, नोकरी, आरक्षण यावर धोरण ठरवताना आकडे हेच सत्य सांगतात.



ओबीसी समाजासाठी प्रत्यक्ष ओबीसी मध्ये येणाऱ्या जातीची गणना होणार असून, संपूर्ण भारत वर्षामध्ये ओबीसी समाज किती आहे हे कळणार असून त्यासाठी आरक्षण निश्चित होणार ही आता काळया दगडावरची पांढरी रेघ आहे. जातीने जनगणना झाल्यास विविध प्रश्न सुटू शकतात अनेक गोष्टींचा निकाल लागू शकतो. भारत वर्षामध्ये ओबीसी समाज हा उपेक्षित राहिलेला समाज म्हणून ओळखला जातो. त्यांच्यासाठी उन्नती करण्यासाठी ओबीसीची जातीय जनगणना कोणी आता अपरिहार्य ठरणार असून विविध योजना आणता येतील केंद्र सरकारला त्या राबवल्या लागतील, त्यासाठी सामाजिक राजकीय आर्थिक शैक्षणिक आरोग्य विषयक या सगळ्या योजना राबवण्यासाठी ओबीसी समाजाची जनगणना आता महत्वपूर्ण ठरणार आहे.

आजवर जइउ समाजाचा वापर केवळ मतांसाठी केला गेला, पण त्यांच्या संख्येची आणि सामाजिक स्थितीची अधिकृत आकडेवारी दडपली गेली. आता ही जातीनिहाय जनगणना आमच्या हक्कांच्या पुनर्स्थापनेसाठी आणि समताधिष्ठित समाजासाठी टर्निंग पॉईंट ठरेल.

मी केंद्र सरकारच्या या निर्णयाचे स्वागत करतो आणि सांगतो - ही लढाई आता थांबणार नाही.

आम्ही ही जनगणना वेळेत, पारदर्शक आणि अचूक व्हावी. यासाठी सुद्धा प्रयत्न करणे गरजेचे आहे अखिल भारतीय ओबीसी समाज एकत्र येणे गरजेचे आहे आणि त्यासाठी सामाजिक समूहदर्शन होणे गरजेचे आहे जाणीव जागृती होणे गरजेचे आहें.



**जालना येथील कालिंका स्टील येथे राजस्थान चे राजपाल हरिभाऊ बागडे यांनी भेट दिली यावेळी कालिंका स्टीलचे संचालक घनश्यामजी गोयल सत्कार करताना सोबत अरुण अग्रवाल अनिल गोयल गोपाल गोयल गोविंद गोयल रितेश मिश्रा अनुज बन्सल मनोज जिंदल आदित्य जिंदल श्रेय गोयल अनामृत फाउंडेशन चे सुदर्शन दिसत आहे.**

# घरकुल आणि पीआर कार्ड च्या मागणीसाठी बहुजन समाज पार्टीचे पालिका कार्यालयावर धडक मोर्चा

**जालना । प्रतिनिधी -** बहुजन समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष सुधाकर भाई निकाळजे यांच्या नेतृत्वाखाली दिनांक पाच सोमवार रोजी झाला शहरातील मस्तगड येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून ते जालना शहर महानगरपालिका कार्यालय पर्यंत धडक मोर्चा काढण्यात येणार आहे शहरातील झोपडपट्टी धारकांना प्यार कार्ड लागू करावे तसेच शहरांमध्ये घरकुल योजना मोठ्या प्रमाणात राबवावी या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात येणार असून मनपा आयुक्त यांना निवेदन देण्यात येणार आहे.

नागरिकांनी मोठ्या प्रमाणात मोर्चामध्ये सहभागी होण्याचे आवाहन आज दि.०३ शनिवार रोजी दुपारी बारा वा. च्या सुमारास शहरातील भिमराज चौक येथे आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

पान १ वरुन

## बांबूला पर्यावरणपूरक ...

बदलावर परिणाम करणारे प्रभावी पीक आहे. ते कार्बन शोषून हवामान संतुलित ठेवते. जमिनीची धूप व भूजल पुनर्भरणासाठी उपयुक्त असून, हरित क्षेत्र वाढवण्यास हातभार लावते. बांबूपासून विविध उत्पादन १८०० पेक्षा अधिक उत्पादने जसे काठी, टोपल्या, फर्निचर, कपडे, चारकोल, टिश्यू पेपर इत्यादी तयार होतात. त्यामुळे स्थानिक उद्योजकांना चालना मिळते. बांबू उत्पादकांना निश्चित बाजारपेठ उपलब्ध होते. मनरेगा योजनेतून हेक्टरी ६ लाखांपर्यंत अनुदान मिळते.ग्रामीण व आदिवासी भागांतील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. महिलांना स्वावलंबी बनवणाऱ्या हस्तकला व उत्पादनक्षम उपक्रमांना चालना मिळते. हरित भारत, वनराणी, सस्टेनेबल ॲग्रीकल्चर योजनेशी सुसंगत आहे. कृषी-औद्योगिक धोरणांसोबत हे पीक जुळते. शाश्वत शेतीच्या दिशेने एक ठोस पाऊल ठरू शकते. सामाजिक, पर्यावरण, आर्थिक आणि धोरणात्मक फायदे विचारात घेता, बांबू ला पर्यावरणपूरक पिकाचा दर्जा देण्यात यावा आणि त्या दृष्टीने शासनाने सकारात्मक पावले उचलावीत, अशी मागणी डॉ. कुलकर्णी यांनी केली.

## चुकून निमंत्रण ...

मतदारसंघातून पहिली संधी मिळाली. सुधाकर नाईक यांच्या मंत्रिमंडळात काम केलं. शरद पवारांचा मुख्यमंत्री म्हणून कार्यकाळ पाहिला, असं अजित पवार म्हणाले. आज बरेच मुख्यमंत्री इथ नाहीत. मी अशोक चव्हाण यांचा कार्यकाळ पाहिला. विदर्भाला चांगल्या प्रकारे संधी मिळाली मराठवाड्यात देखील मान्यवरांना संधी मिळाली पश्चिम महाराष्ट्रात देखील संधी मिळाली. कोकणालही संधी मिळाली. ६५ वर्षानंतर महिला मुख्यमंत्री झाली नाही. आम्हालाही वाटत महिला मुख्यमंत्री व्हायला हवी. केवळ उत्तर महाराष्ट्राला मुख्यमंत्री पदाची संधी मिळाली नाही. २००४ साली ती संधी आली होती मात्र काय झालं हे प्रफुल पटेल यांना माहिती आहे, असं अजित पवार म्हणाले.

मुख्यमंत्र्याचा दरारा काय असू शकतो हे मी नारायण राणे यांच्या रूपाने पाहिलं आहे. विरोधी पक्षनेता म्हणून सुद्धा मी पाहिलं नारायण राणे यांनी सभागृहात नुसतं मागे पाहिलं तरी सगळे शिवसेना आमदार चिडीचूप होऊन जायचे, असं अजित पवार म्हणाले. अशोक चव्हाण आणि मी एकाच बॅचचे आहोत, त्यांना कमी कार्यकाळ मिळाला, असं अजित पवार म्हणाले.

एकनाथ शिंदे यांचा ४ वाजता फोन आला त्यांनी ते दरे गावात असल्याचं सांगितल. नाना पाटेकर आणि श्री श्री रविशंकर यांचा कार्यक्रम असल्यामुळे ते आले नाहीत. आपण ज्यावेळी यशवंतराव चव्हाण यांचं नाव घेतो त्यावेळी सर्वसमावेशक राजकारण करायला हवं. सुसंस्कृत राजकारण स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी शिकवले आहे. जातीय सलोखा राखला गेला पाहिजे. असे अनेक निर्णय एनडीए'च्या नेतृत्वाखाली पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत.

एकनाथ शिंदे यांना मी सांगणार आहे जर त्यांना येण शक्य नसेल तर प्रतिनिधी पाठवू नका कारण हा सन्मान महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याचा सन्मान आहे. त्यांनीच तो स्वीकारला असता तर बर वाटलं असतं, असंही अजित पवार म्हणाले.

## सनातन संस्थेच्या ...

ईश्वरप्राप्ती लांब नाही. 'समाजात साधनेचा प्रचार-प्रसार करणे आणि समाजाला समष्टी साधनेविषयी अवगत करणे', हा आपला धर्म आहे. यामुळे समाजात जागृती निर्माण होईल आणि आपले राष्ट्र सात्त्विक होईल, असेही त्यांनी सांगितले.

या वेळी ब्रह्मश्री डॉ. सोमनाथ राघवन् आचार्य म्हणाले की, आपल्या गुरूंचे कृपाशीर्वाद आणि त्यांचा परीसस्पर्श लाभल्यास आपण अध्यात्माच्या मार्गावर मार्गक्रमण करू शकतो. तर 'जागतिक शांतता संघटने'चे आंतरराष्ट्रीय महासचिव प्रा. डॉ. सुरेश के. गुप्तन् म्हणाले की, जगात ६५ टक्के जनतेमध्ये निराशा दिसून येते. या सर्व आजारांना मानवी भावना हे कारण आहे. या भावनांवर नियंत्रण असणे आवश्यक आहे. शिवोहम् टेंपल ऑफ कॉन्शियसनेस ट्रस्टचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. सी.व्ही. रविंद्रनाथ यांच्या कन्या शुभा रविंद्रनाथ यांनी कार्यक्रमाच्या आरंभी सर्वांचे स्वागत केले. त्यानंतर 'निर्वाण षट्कम' म्हणण्यात आले. 'कृष्णा बिच रिसॉर्ट'चे श्री. सुमल यांनी आभारप्रदर्शन केले.

## पहलगाम हल्ल्यानंतर ...

भेट दिली आहे. घटनास्थळी तपासाच्या प्रगतीचा आढावा घेतला. त्यांनी स्थानिक अधिकाऱ्यांसोबत एक उच्चस्तरीय बैठकही घेतली. या बैठकीत, सध्याच्या सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेण्याबरोबरच, गुप्तचर यंत्रणा मजबूत करण्यावर आणि सामायिक माहितीची चांगली देवाणघेवाण करण्यावर विशेष भर देण्यात आला.

दरम्यान, जम्मू आणि काश्मीर पोलिस, लष्कर आणि इतर सुरक्षा एजन्सींनी संयुक्त कारवाई सुरू केली आहे. अटक केलेल्या ओव्हरग्राउंड कामगारांशी (ओजीडब्ल्यू) संबंधित सुमारे १०० लपण्याच्या ठिकाणांवर छापे टाकले. छाप्यादरम्यान, बंदी घातलेल्या दहशतवादी गट अल-उमर मुजाहिदीनचा संस्थापक मुश्ताक अहमद जरगर उर्फ लातराम यांच्या घराचीही झडती घेण्यात आली. झरगर हा तोच दहशतवादी आहे जो १९९९ मध्ये इंडियन एअरलाइन्सच्या विमान आयसी-८१४ च्या अपहरणानंतर सोडण्यात आला होता.

एनआयए आणि जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी आतापर्यंत ९० ओजीडब्ल्यू विरुद्ध यूएपीए अंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत, तर सुमारे ३००० संशयितांची चौकशी करण्यात आली आहे. या हल्ल्यामागे एक खोल कट आहे, ज्याचे थर हळूहळू उघड होत आहेत, असे तपास यंत्रणांचे मत आहे. या अहवालाच्या आधारे केंद्रीय गृह मंत्रालय भविष्यातील रणनीती ठरवेल आणि सुरक्षा व्यवस्था आणखी कडक करण्यासाठी सूचना जारी करू शकते.

२२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. यामध्ये २६ जणांची गोळ्या घालून हत्या केली होती. ही घटना घडवून आणल्यानंतर दहशतवादी पळून गेले होते. या घटनेनंतर एनआयएनेही हल्ल्याचा तपास सुरु केला. एनआयए अधिकाऱ्यांनी या घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांशीही बोलले आणि त्यावेळी ते त्यांच्यासोबत होते. दहशतवाद्यांनी पर्यटकांना का लक्ष्य केले आणि त्यामागील त्यांचा हेतू काय होता, या घटनेच्या तळाशी जाण्याचा तपास पथक प्रयत्न करत आहे.

# जालना जिल्ह्यातील अबूजर आसेफ बेगची राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेसाठी निवड



**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील जालना जिल्हा फुटबॉल अकॅडमीतून घडलेला होतकरू खेळाडू अबूजर आसेफ बेग याची राष्ट्रीय स्तरावरील फुटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. चेन्नई येथे होणाऱ्या इंडिया आय लीग अंडर-१३ फुटबॉल स्पर्धेच्या प्ले-ऑफ्समध्ये अबूजर राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. ही स्पर्धा दिनांक ७ मे ते ११ मे दरम्यान होणार आहे. हा सामना स्पोर्ट्स मेनिया विरुद्ध मिनर्वा पंजाब फुटबॉल अकॅडमी आणि दुसरा सामना ईस्ट बंगाल किक स्टार्ट विरुद्ध स्पोर्ट्स मेनिया असा होणार आहे.

अबूजरची सुरुवातीला पुणे येथील स्पोर्ट्स मेनिया अकॅडमीत निवड झाली होती. तेथे त्याने उत्कृष्ट कामगिरी करत आपले कौशल्य सिद्ध केले. त्याच्या दमदार प्रदर्शनामुळे त्याची निवड राष्ट्रीय पातळीवरील संघात झाली आहे.

संघाने चेन्नई येथे होणाऱ्या आय लीग स्पर्धेच्या प्ले-ऑफसाठी पात्रता मिळवली आहे.

अबूजरच्या यशामागे प्रशिक्षक शेख रियाज युसुफ आणि अब्दुल रौफ खान (मोहन बागान प्लेयर माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू ) चे विशेष मार्गदर्शन मिळाले तसेच स्पोर्ट मेनिया अकॅडमी चे प्रशिक्षक परेश सर ( इंटरनॅशनल प्लेयर डब्ल्यू आय एफ ए संतोष ट्रॉफी हेड कोच) कुणाल सावंत मुंबई एफसी खेळाडू ), इस्माईल शेख, निखिल कदम ,(आयएसएल प्लेयर) यांनी त्याच्या खेळाची दखल घेऊन त्याला योग्य मार्गदर्शनही केले त्याचबरोबर किशोर जाधव यांनी या खेळाडूचे अभिनंदन केले आहे.

अबूजरच्या या यशामुळे जालना जिल्ह्याला अभिमान वाटावा अशीच स्थिती निर्माण झाली आहे. त्याच्या पुढील वाटचालीसाठी जिल्ह्यातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# बेकायदेशीर बालगृहे, अनाथाश्रम, वसतिगृहे आढळुन आल्यास शासनास कळविण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** पुणे जिल्ह्यातील आळंदी व ठाणे जिल्ह्यातील खडवली येथे बेकायदेशीर बालगृहे, वसतिगृहे, अनाथाश्रम चालविले जात असल्याबाबतच्या बातम्या प्रकाशित झाल्या आहेत. वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झालेल्या बातम्यानुसार तसेच सदर संस्थांमध्ये बालकांना अनधिकृतपणे डांबून ठेवण्यात येऊन त्यांचे शारिरीक, मानसिक आणि लैंगिक शोषणाच्या घटना घडत असल्याबाबतच्या बातम्या प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास येत आहे. सदर बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असून बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ आणि सुधारित अधिनियम २०२१ तसेच महाराष्ट्र राज्य बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील तरतुदीचे उल्लंघन करणाऱ्या आहेत.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ आणि सुधारित अधिनियम २०२१ मधील कलम ४२ नुसार मान्यता तथा सोबतच्या नोंदणी प्रमाणपत्राप्रमाणे नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त नसलेली संस्था अथवा अशी संस्था चालविणाऱ्या व्यक्तीला १ वर्ष कारावास तसेच रुपये १ लक्ष पेक्षा कमी नसेल एवढा दंड किंवा दोन्हीही करण्यात येईल अशी तरतुद नमुद करण्यात आलेली आहे.

आपल्या आसपासच्या परिसरामध्ये अनधिकृत संस्था आढळून आल्यास जिल्ह्यातील जिल्हा महिला व बालविकास अधिकारी तसेच चाईल्ड हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०९८ यावर संपर्क साधून बालकांवरील शारिरीक तसेच लैंगिक अपराधास प्रतिबंध करण्यासाठी सहकार्य करावे असे जाहिर आवाहन नयना गुंडे आयुक्त महिला व बालविकास आयुक्तालय पुणे यांनी केले आहे.

ईन्नरव्हील क्लब होरायझनतर्फे पोलीस ठाण्याला कायद्याची पुस्तके भेट

# ज्ञानवृद्धीसाठी महत्त्वाचे पाऊल-आयुष नोपाणी



**जालना । प्रतिनिधी -** जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून ईन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनतर्फे भोकरदन पोलीस ठाण्यात कायद्याशी संबंधित दर्जेदार पुस्तके भेट देण्यात आली. या कार्यक्रमात अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांच्या हस्ते ही पुस्तके पोलीस ठाण्याच्या ग्रंथालयासाठी सुपूर्द करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्लबचे अध्यक्ष अ‍ॅड. अश्विनी धन्नावत होत्या. याप्रसंगी ड. महेश धन्नावत, शंभर रुपये सोशल क्लबचे उदय शिंदे, फौजदार सागर शिंदे आणि अभिजीत मंडले यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी बोलताना अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी म्हणाले की, पोलीस कर्मचारी कायद्यासंबंधी सतत अपडेट राहावेत, यासाठी अशा पुस्तकांची उपलब्धता अत्यंत महत्त्वाची आहे. या पुस्तकांमुळे पोलीस दलाच्या ज्ञानात वाढ होईल आणि कार्यक्षमता सुधारण्यास मदत होईल. उपक्रम समाजातील जबाबदार नागरिकत्वाचे उदाहरण आहे. ईन्नरव्हील क्लबच्या अध्यक्षा ड. अश्विनी धन्नावत यांनी पुस्तक भेट देण्यामागील उद्देश स्पष्ट करताना सांगितले की, पोलीस हे समाजाच्या सुरक्षेसाठी अहोरात्र झटणारे खरे रक्षक आहेत. त्यांना न्यायप्रणाली आणि कायद्याबाबत अधिक सखोल माहिती व्हावी, या उद्देशाने आम्ही ही पुस्तके भेट दिली. हे केवळ पुस्तकांचे योगदान नसून, हे समाजाशी जोडलेले एक ज्ञानदायी नातेसुद्धा आहे.

कायद्याची ही पुस्तके फौजदार सागर शिंदे व अभिजीत मंडले यांच्याकडे औपचारिकरीत्या सुपूर्द करण्यात आली. या उपक्रमाबद्दल उपस्थितांनी ईन्नरव्हील क्लबचे विशेष कौतुक केले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.